



संकल्प प्रगतीचा..
पाल जि.प.
गटाच्या
सर्वांगीण
विकासाचा..!



# सातारा जिल्हा परिषद व
# कराड पंचायत समिती निवडणूक २०२६

## निवडणूक चिन्ह



सबका साथ..
सबका विकास..
सबका विश्वास..!



(५४-पाल जि.प.गटाचे भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार)

(१) माधवराव निवृत्ती काळभोर (मदनभाऊ)

(१०८-चरेगांव पं. स. गणाचे भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार)

(३) धैर्यजा स्वप्निल माने

# संकल्पपत्र

'कमळ' या चिन्हासमोरील बटण दाबून प्रचंड मतांनी विजयी करा....

**मतदान - शनिवार दि. ०७/०२/२०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायं. ५.३० वा.**


• प्रकाशक : भारतीय जनता पार्टी, पाल जिल्हा परिषद गट • प्रती : ५०० • मुद्रक : के.के.ग्राफिक्स

# संकल्पपत्र



**सबका साथ.. सबका विकास.. सबका विश्वास..!**

पाल जि. प. गटातील सर्व मतदार बंधू व भगिनींना सहृदय सप्रेम नमस्कार,

आपण सर्वजण ज्ञात आहातच सध्या सातारा जिल्हा परिषद व कराड पंचायत समिती २०२६ ची निवडणूक सुरु आहे. या निवडणुकीमध्ये जगातली सर्वात राजकीय मोठा पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार म्हणून कराड उत्तर चे **आमदार मनोजदादा घोरपडे** यांच्या नेतृत्वाखाली आपणा सर्वांच्या साथीने या निवडणुकीला सामोरे जात आहोत.

**पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी** यांचे नेतृत्वाखाली भारत देशाच्या विकासाचा संपूर्ण जगभर डंका वाजत आहे. सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास हे ध्येय समोर ठेऊन गेली दशकभर आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी काम करीत आहेत. **मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्र फडणवीस** आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्र राज्याला विकासाच्या दिशेने घेऊन जाताना विविध प्रभावी योजना राज्यभर राबवित आहेत.


अशा परिस्थितीत आपल्या जिल्हा परिषद गटाची व गणाची सत्ता स्थाने हि एकच पक्ष केंद्रित व व्यक्तिकेंद्रित झाल्यामुळे ज्या पद्धतीने या भागाचा विकास व्हयला हवा होता त्यापद्धतीने झालेला नाही याची खंत वाटते म्हणूनच हा विकासाचा बॅकलॉग भरून काढण्यासाठीच एक संधी म्हणून या निवडणुकीला आम्ही सामोरे जात आहोत.

जशी आपल्या भागाची स्थिती आहे तशीच परिस्थिती काही वर्षांपूर्वी आपल्या कराड उत्तर विधानसभा मतदार संघाची होती. कराड उत्तर मतदारसंघामध्ये परिवर्तन झाल्यानंतर **आदरणीय आमदार मनोजदादा घोरपडे** यांनी विकासाचा झंझावात निर्माण करून आपल्या जिल्हा परिषद गटातील सर्व गावांमध्ये विविध विकास कामांसाठी करोडो रुपये निधी देऊन या भागाचा चेहरा मोहरा बदलण्याचा संकल्प केला आहे.

पाल जि. प. गटाचे व पाल पंचायत समिती गणाचे प्रतिनिधी म्हणून आम्हीही विकासाचा संकल्प समोर ठेऊन या निवडणुकीला सामोरे जात आहोत. कराड उत्तर विधानसभा मतदारसंघाची अवस्था जशी एक बाजूला सुजलाम सुफलाम व दुसऱ्या बाजूला तीव्र दुष्काळ अशी त्याप्रमाणेच आपल्या जि. प. गटाची हि अवस्था आहे. ही परिस्थिती पूर्णपणे बदलण्यासाठी आम्ही विकासाची **सप्तसूत्री** तयार केली असून यामध्ये .....

**१. पाणी :** आजही बराचसा भाग हा पाण्यापासून वंचित असून जिल्हा परिषद गटातील व गणातील अजूनही सर्व गावांमध्ये पिण्यासाठी शुद्ध पाणी व शेतीसाठी मुबलक पाणी उपलब्ध नसून ते उपलब्ध करून देणे हे आमचे मुख्य लक्ष आहे.

हर घर जल
जल जीवन मिशन



# संकल्पपत्र



**सबका साथ.. सबका विकास.. सबका विश्वास..!**

**२. रस्ते :** जिल्हा परिषद गट व गणातील सर्व गावांमध्ये संपर्क कमी असून अजूनही बरीच गावे मुख्य पक्या रस्त्या पासून वंचित आहेत याकरिता रस्त्याचे जाळे निर्माण करून दळणवळण व्यवस्था वाढविण्याचा आम्ही संकल्प केला आहे.







**३. वीज :** राज्य शासनाच्या माध्यमातून घरगुती वापरासाठी व उद्योगधंदे तसेच शेतीसाठी पुरेशी वीज उपलब्ध असली तरी ही संपूर्ण व्यवस्था पारंपरिक ऊर्जा स्रोतांवरती अवलंबून आहे. त्याकरिता याव्यवस्थेमध्ये अपारंपरिक (सौर ऊर्जा, पावन ऊर्जा इ.) स्रोत निर्माण करणे हे आमचे उद्दिष्ट असेल.

**४. रोजगार:** मुख्यत्वे शेतीवरती अवलंबून असणारा हा आपला भाग असून यामध्ये युवकांसाठी शेती पूरक उद्योगधंदे निर्माण करणे व महिलांसाठी बचत गटाच्या माध्यमातून व्यवसाय करण्यासाठी शासनाच्या विविध योजना उपलब्ध करून देणे हे आमचे आद्य कर्तव्य आहे.







**५. आरोग्य:** स्वत:च्या वैयक्तिक व सार्वजनिक आरोग्यास प्राधान्य देणे हे आपले काम असून त्याकरिता गावोगावी आरोग्य सुविधा उभारून त्याचा लाभ सर्वांना मिळवून देणे तसेच सातत्याने आरोग्य शिबिरे राबवून सर्व नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे हे आमचे परम कर्तव्य आहे.



NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

**६. पर्यटन:** आपला भागामध्ये बरीच जैव विविधता असून प्रमुख धार्मिक स्थळे ही आपल्या भागात आहेत परंतु या सर्वांचा म्हणावा तसा विकास झालेला नसून पर्यटन वाढीसाठी व यातून रोजगार निर्मिती तसेच सक्षम अर्थकारण या करीता या सर्व स्थळांचा पर्यटनाच्या दृष्टिकोनातून विकास होणे महत्वाचे असल्याने तो करण्याचा संकल्प ही आम्ही केला आहे.





संकल्पपत्र

**७. शिक्षण:** आपल्या जिल्हा परिषद गटातील शाळांचा दर्जा उंचावून अत्याधुनिकेतून दर्जेदार शिक्षण सर्वांना मिळावे हा आमचा मुख्य संकल्प आहे



सर्व शिक्षा अभियान
सब पढ़ें सब बढ़ें



याव्यतिरिक्त केंद्र शासनाच्या माध्यमातून अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत मिळणारे मोफत रेशनिंग धान्य, राज्य शासनाच्या माध्यमातून महिलांसाठी लाडकी बहीण योजना यासारख्या योजना आपणापर्यंत पोहचवून त्याचा लाभ मिळवून देणे तसेच तरुण युवक, महिला व जेष्ठ नागरिक यांना शासनाच्या इतर सर्व योजनांचा लाभ देणे हे आमचे आद्य कर्तव्य असून त्याकरिता आम्हाला आपल्या **मनरुपी आशीर्वादाची** गरज असून आपण सर्वजण निश्चितपाने मत रुपी आशीर्वाद दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या जि. प. व पं. स. समिती निवडणुकीमध्ये **कमळ** चिन्हासमोरील बटन दाबून द्याल याची आम्हाला खात्री असून आपले मत वाया जाणार नाही याचा विश्वास या संकल्प पत्राद्वारे आम्ही आपणास देत आहोत.

धन्यवाद,..!

आपलेपणा जपणारे आपले जि. प. गट व पं. स. गणाचे भविष्यातील

# आपले जनसेवक

संकल्प प्रगतीचा..
पाल जि.प. गटाच्या
सर्वांगीण
विकासाचा..!

सबका साथ..
सबका विकास..
सबका विश्वास..!

५४-पाल जि.प.गटाचे भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार

| | | |
|---|---|---|
| १ | माधवराव निवृत्ती काळभोर (मदनभाऊ) |  |

१०८-चरेगांव पं. स. गणाचे भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार

| | | |
|---|---|---|
| ३ | धैर्यजा स्वप्निल माने |  |

**'कमळ'**
या चिन्हासमोरील बटण दाबून प्रचंड मतांनी विजयी करा....